# यावल महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा

यावल (वार्ताहर) जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग व IQAC विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिन ऑनलाइन साजरा करण्यात आला. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला महाविद्यालयात उपप्राचार्य प्रा. ए. पी. पाटील व प्रमुख पाहुणे श्री. किरण दुसाने ( माजी मुख्याध्यापक, सानेगुरुजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, यावल) यांच्या हस्ते पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात आले. यानंतर ऑनलाइन कार्यक्रम सुरू करण्यात आला.

ऑनलाइन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. किरण दुसाने व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे होत्या. श्री. किरण दुसाने यांनी आपल्या भाषणात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन-कार्यावर अनमोल असे मार्गदर्शन केले तसेच प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे यांनी देखील विद्यार्थ्यांना सांगितले की, आपल्या शिक्षकांचे आदर्श डोळयासमोर ठेवून महाविद्यालयातील शैक्षणिक जीवनात वाटचाल करावी असे मार्गदर्शन केले. या ऑनलाईन कार्यक्रमाला एकूण 45 विद्यार्थी हजर होते.

शिक्षक दिन कार्यक्रमाचे आयोजन श्री.संजीव विठ्ठलराव कदम, डॉ. एस. पी. कापड़े व प्रा. एस. आर. गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस. पी. कापडे यांनी केले तसेच प्रमुख पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्य एम.डी. खैरनार यांनी करून दिला व आभार प्रा. आर. डी. पवार यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न होण्यासाठी डॉ. पी. व्ही. पावरा, मिलिंद बोरघडे, संतोष ठाकूर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.






2021/9/5 14:29

# यावल येथील महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा



यावल : येथील जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग व क्द्अउ विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिन ऑनलाइन साजरा करण्यात आला. भारताचे राष्ट्रपती शिक्षक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला महाविद्यालयात उपप्राचार्य प्रा. ए. पी. पाटील व प्रमुख पाहुणे किरण दुसाने ( माजी मुख्याध्यापक, सानेगुरुजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, यावल) यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व पुष्पहार अर्पण करण्यात येवुन अभिवादन करण्यात आले. शिक्षक दिन कार्यक्रमाचे आयोजन संजीव विठ्ठलराव कदम, डॉ. एस. पी. कापड़े व प्रा. एस. आर. गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस. पी. कापडे यांनी केले तसेच